# प्रेसनोट

## स्वत:च्या मुलीचा निर्घृणपणे खुन करून मृतदेह पुरणा-या आई-वडीलांना मुंब्रा पोलीसांनी केली अटक.

---

दिनांक ०५/०४/२०२४ रोजी मुंब्रा पोलीस स्टेशनला, मा.पोलीस उपआयुक्त परिमंडळ-१ ठाणे यांचे कार्यालयाकडुन जा.क्र पोउपआ/परि-१/स्था अ/३९६/२०२४ दिनांक ०१/०४/२०२४ अन्वये अर्जदार संतोष हरिलाल महादेव यांचे नावे करण्यात आलेला अर्ज दिनांक ०४/०४/२०२४ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जातील आशय व फोटो पाहुन गांभीर्य लक्षात घेवुन पोलीस ठाणे हद्दीतील हॉस्पिटल्स व कब्रस्थान चेक करून मयत मुलगी लबीबा शेख वय १.५ वर्षे हिस दिनांक १९/३/२०२४ रोजी रात्री ०२.३० वा. दफन केल्याबाबत माहिती प्राप्त केली, मेडफॉर्ड हॉस्पिटल व अलमास हॉस्पिटल यांचेकडे सदर अर्जाचे अनुषंगाचे चौकशी करून, मुलगी लबीबा शेख वय १.५ वर्षे हिच्चावर करण्यात आलेल्या उपचाराची माहिती प्राप्त केली. मेडफॉर्ड हॉस्पिटल व अलमास हॉस्पिटल यांच्या मधील मुलींच्या उपचाराचा बाबत विसंगती आढळुन आली. तसेच गैरअर्जदार १) जाहीद सलामत शेख, वय ३८ वर्षे २) नुरानी जाहीद शेख, वय २८ वर्षे, सध्या रा. रूम नंबर ७, यासिन प्लाझा शिवाजीनगर दर्गा रोड अमृतनगर मुंब्रा यांचेकडे चौकशी केली असता, मुलीचे आई - वडील हे मुलीच्या मृत्युचे कारण लपवीत असल्याचे त्यांचे जबाब वरुन स्पष्ट झाले होते.

यातील मयत मुलगी नामे लबिबा शेख वय १.५ वर्षे हिस आरोपीत १) जाहीद सलामत शेख, वय ३८ वर्षे २) नुरानी जाहीद शेख, वय २८ वर्षे, यांनी आपसात संगणमत करून कोणत्या तरी अज्ञात कारणा वरून मयत मुलगी हिस कोणत्यातरी धारदार शस्त्राने डोक्यावर व डोक्याचे मागील बाजुस वार करून गंभीर जखमी केले, त्यात तिचा मृत्यू झाला आहे. मृत्यु नंतर सदर घटनेबाबत पोलीस ठाण्यात कोणतीही माहिती न देता तसेच रूग्णालयात मयत मुलगी लबीबा शेख वय १.५ वर्षे हिचे दुखापतीबाबत चुकीची माहिती देवून, त्याबाबत हॉस्पिटलची मृत्यु दाखला (डि.सी.) प्राप्त करून घेवून मयत मुलगी रितीरिवाजाप्रमाणे विधीयुक्त कौसा कब्रस्थान येथे पुरलेले (दफन) केले म्हणुन, मुंब्रा पोलीस ठाण्यात गु.रजि.नंबर ११५३/२०२४ भादवि कलम ३०२, २०१, ३४ प्रमाणे दाखल करून दिनांक ०५/०४/२०२४ रोजी १६.३१ वा. दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनूषंगाने मुलीचे विधीवहीत दफन केलेले शव मा. न्यायालयाचे आदेशाने, नायब तहसिलदार, वैदयकिय अधिकरी, पंच याचे समक्ष बाहेर काढून शवावर शवविच्छेदन छ.शि.म. हॉस्पिटल येथे करून, मा. वैदयकिय अधिकारी यानी दिलेल्या अभिप्रायावरून **multiple incised wound over scalp** असे दिल्याने '' फाईनल ओपिनियन रिझर्व केमिकल ॲनालेसीस रिपोर्ट '' असे दिले असुन, सदर मुलीचा मृत्यु हा तिचे डोक्यावर केलेल्या जखमांमुळे झाल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने दिनांक १०/०४/२०२४ रोजी स्टेशन डायरी नोंद क्रमांक २२/११.५२ वा. अटक मयत मुलगी हिचे वडील १) जाहीद सलामत शेख, वय ३८ वर्षे २) नुरानी (खातुन) जाहीद शेख, वय २८ वर्षे, सध्या रा. रूम नंबर ७, यासिन प्लाझा शिवाजीनगर दर्गा रोड अमृतनगर मुंब्रा यांना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा तपास पुढे चालु आहे.

नमुद गुन्हयाच्या तपासात मा. पोलीस आयुक्त श्री आशुतोष डुंबरे, सह पोलीस आयुक्त श्री ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त ( पश्चिम प्रादेशिक विभाग ) श्री विनायक देशमुख, पोलीस उप आयुक्त श्री सुभाष बुरसे, सहा. पोलीस आयुक्त श्री उत्तम कोळेकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री अनिल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री संजय दवणे, सह तपासी अधिकारी सपोनि कोरडे व गुन्हे प्रकटीकरण पथक यांनी तपास केला आहे.

Scanned with OKEN Scanner